# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## दिनांक ३१/०७/२०२४ (बुधवार) सकाळ

### पोस्टे सावनेर अंतर्गत खाजगी शिकवणी वर्ग संस्थापक, शिक्षक यांची बैठक संपन्न

पोलीस स्टेशन सावनेर येथे दिनांक ३०/०७/२०२४ रोजी १८.३० ते १९.३० वाजता पर्यंत मा. श्री अनिल म्हस्के सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर यांचे अध्यक्षतेखाली व श्री रवींद्र मानकर पोलीस निरीक्षक सावनेर यांचे उपस्थितीमध्ये खाजगी शिकवणी वर्ग संस्थापक, शिक्षक यांची बैठक घेण्यात आली. बैठकीमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मार्गदर्शन सूचना देण्यात आल्या. क्लासरूम मध्ये व पार्किंग मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावावे. खाजगी सुरक्षा रक्षकची नेमणूक करावी सुरक्षारक्षकाचे पोलीस व्हेरिफिकेशन करून घ्यावे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षा संबंधात काळजी घेण्याबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी शब्दश्री टयुशन क्लासेस सावनेरचे संस्थापक श्री. शब्दप्रकाश ब्रम्हणपुरे, वर्च्यु टयुटोरीयल क्लास सावनेर येथील श्रीमती मनिषा वाट, उत्कर्ष करिअर ॲकेडमी सावनेरचे संस्थापक श्री. दशरथ बोबडे, गुरूकुल ॲकेडमीचे संस्थापक श्री. आकाश टोरीया, संकल्प टयुशन क्लासेसचे श्री. दिनेश भिसे, कपिल टयुशन क्लासेसचे श्री. कपिल राजू आडे, श्री गजानन करियर ॲकेडमीचे श्री प्रदीप बनफर, इन्सपायर क्लासेसचे श्री. हरीष चरपे, जित सुपर लर्नर ॲकेडमीचे श्री. अजय चौधरी, केपरएस वर्ल्ड टयुशन क्लासेसचे श्रीमती सुवर्णा बारई, शिवमुद्रा कोचींग क्लासेसचे श्री. योगेश लाड, विस्डम टयुटोरीयलचे श्री. कुलदिप हिराले तसेच शिक्षकवर्ग उपस्थित होते.





पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर